# STI - मुख्य परीक्षा - 2017
## पेपर 1
## मराठी व इंग्रजी

1. **खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा :**
अ. अचूक - बरोबर
ब. प्रवास - सफर
क. इमारत - सदन
ड. आचारी - स्वयंपाकी
**पर्यायी उत्तरे :**
(1) अ व क (2) क
(3) ब (4) ब व ड

2. **'गारा' या शब्दाचे पुढीलपैकी कोणते अर्थ मराठी भाषेत होतात?**
(1) पावसाळ्यात पडणाऱ्या गारा
(2) 'गार' चे पुल्लिंगी रूप
(3) चिखल
(4) पर्याय क्र. (1) आणि (3) बरोबर

3. **परभाषेतून आलेल्या शब्दांचे लिंग कसे ठरते?**
(1) परभाषेतून आलेल्या शब्दांचे लिंग त्याच्या वाक्याच्या अर्थावरुन ठरते.
(2) परभाषेतून आलेल्या शब्दांचे लिंग त्याच्या कर्त्याच्या लिंगावरुन ठरते.
(3) परभाषेतून आलेल्या शब्दांचे लिंग त्याच्या कर्मावरुन ठरते.
(4) परभाषेतून आलेल्या शब्दांचे लिंग त्याच अर्थाच्या मराठी शब्दाच्या लिंगावरुन ठरते.

4. **पुढील वाक्याचे प्रश्नार्थक वाक्यात रूपांतर करा.**
**'कोणी नको म्हणणार नाही.'**
(1) फुकट दिले तर कोण नको म्हणेल?
(2) कोणीच नको म्हणत नाही, फुकट मिळाले तर?
(3) कोण कशाला नको म्हणतील?
(4) नाही म्हणणे कोणालाही नको वाटत नाही?

5. **वस्तूच्या अंगाचा गुण-धर्म म्हणजेच भाव व्यक्त करणाऱ्या नामाला ....... म्हणतात.**
(1) भाववाचकनाम
(2) सामान्यनाम
(3) गुणविशेषनाम
(4) विशेषनाम

6. **'पाऊस पडत असेल तर आपण काही नाटकाला येणार नाही.' या वाक्यातील 'आपण' हे ....... सर्वनाम आहे.**
(1) प्रथमपुरुषवाचक
(2) आत्मवाचक
(3) (1) आणि (2) हे पर्याय बरोबर
(4) द्वितीयपुरुषवाचक

7. **ज्या नामांचा उपयोग वेगवेगळ्या लिंगी होतो, त्यांना काय म्हणतात?**
अ. उभयलिंगी ब. नपुंसकलिंगी
क. स्त्रीलिंगी ड. बहुलिंगी
**पर्यायी उत्तरे :**
(1) अ व ब बरोबर (2) क व ड बरोबर
(3) अ व ड बरोबर (4) ब व क बरोबर

8. **....... हे विशेषण विकारी नाही.**
(1) पांढरा (2) कडू
(3) तांबडा (4) मोठा

9. **निर्जीव वस्तूचे लिंग ठरवताना काय करतो?**
अ. काल्पनिक पुरुषत्व लादतो.
ब. काल्पनिक स्त्रीत्व लादतो.
क. काल्पनिक पुरुषत्व व स्त्रीत्व लादून त्या वस्तू मागे तो, ती, ते हे शब्द वापरतो.
ड. काल्पनिक नपुंसकत्व लादतो.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त अ बरोबर (2) फक्त क बरोबर
(3) फक्त अ व ब बरोबर (4) फक्त अ, ब व क बरोबर

10. **'त्याने माझे काम केले असावे' या वाक्यातील क्रियापद ....... या गटातील आहे.**
(1) संकेतार्थ (2) विध्यर्थ
(3) स्वार्थ (4) आज्ञार्थ

11. **खालीलपैकी व्याकरणदृष्ट्या बरोबर वाक्ये ओळखा.**
अ. लिंगभेदामुळे नामाच्या रूपात बदल होतो.
ब. वचनभेदामुळे नामाच्या रूपात बदल होतो.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त अ बरोबर (2) फक्त ब बरोबर
(3) अ व ब चूक (4) अ व ब बरोबर

**12. 'बाळासाहेबांनी समजावून सांगितले; म्हणून त्याने हे काम केले' या वाक्यातील उभयान्वयी अव्यय ....... प्रकारातील आहे.**

(1) परिणामबोधक (2) उद्देशबोधक
(3) संकेतबोधक (4) कारणबोधक

**13. कर्ता शोधताना प्रथम वाक्यातील क्रियापदाचा मूळधातू शोधून काढावा व त्याला – णारा प्रत्यय लावून 'कोण' असा प्रश्न करावा, म्हणजे कर्ता मिळतो.**

(1) वाक्याचा पूर्वार्ध बरोबर
(2) संपूर्ण वाक्य बरोबर
(3) संपूर्ण वाक्य चूक
(4) वाक्याचा उत्तरार्थ बरोबर

**14. पुढीलपैकी कोणत्या शब्दाचे वाकारांत सामान्यरूप होते?**

(1) बंधु (2) मोती
(3) सासू (4) कावळा

**15. अ. रामाने रावणास मारले.**
**ब. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे.**
**क. त्याने आता घरी जावे.**
**ड. त्याला घरी जाववते.**

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व वाक्ये भावे प्रयोगाची आहेत.
(2) यातील दोन वाक्ये-अकर्मक भावे प्रयोगाची आहेत.
(3) यातील दोन वाक्ये-सकर्मक भावे प्रयोगाची आहेत.
(4) वरील सर्व पर्याय बरोबर आहेत.

**16. पुढील कोणते वाक्य कर्मकर्तरी प्रयोगाचे उदाहरण आहे?**

(1) शिकारी मोरास मारतो.
(2) मोर शिकाऱ्याकडून मारला जातो.
(3) मोराला शिकाऱ्याने मारले.
(4) शिकाऱ्याने मोर मारला.

**17. अधोरेखित शब्दाचे व्याकरण चालवा.**
**भावशून्य डांबरी रस्ते मला <u>आवडत</u> नाहीत.**

(1) विशेषण, गुणविशेषण
(2) विशेषण, नामसाधित गुणविशेषण
(3) तृतीयपुरुषी अनेकवचन, संयुक्त क्रियापद, कर्मक कर्तरी प्रयोग
(4) मूळधातू 'आवड', अकर्मक, अकरणरूपी स्वार्थी

**18. पुढीलपैकी योग्य विरामचिन्हांचा वापर केलेले वाक्य ......**

(1) आईनं बजावलं, ''अभ्यासासाठी रोज पहाटे पाच वाजता उठायचं आहे.''
(2) आईने बजावले, अभ्यासासाठी रोज पहाटे पाच वाजता उठायचे आहे.
(3) आईने बजावले. अभ्यासासाठी रोज पहाटे पाच वाजता उठायचे आहे.
(4) आईने बजावले ! ''अभ्यासासाठी रोज पहाटे पाच वाजता उठायचे आहे !''

**19. 'सध्या मी जातककथांचा अभ्यास करतो आहे.'**
**वरील वाक्याचा प्रकार कोणता?**

(1) विधानार्थी (2) केवलवाक्य
(3) होकारार्थी (4) यापैकी नाही

**20. पुढीलपैकी केवल वाक्य .......**

(1) ऐश्वर्या कादंबऱ्या वाचते.
(2) तो नेहमी उत्कृष्ट काम करतो.
(3) पंतप्रधान दौऱ्यावर गेले होते.
(4) वरील सर्व पर्याय बरोबर

**21. खालील वाक्यांच्या जोड्या जुळवा.**

| | | |
|---|---|---|
| अ. | मी आंबा खाल्ला | I. आज्ञार्थी |
| ब. | तुला परीक्षेत यश मिळो | II. संकेतार्थी |
| क. | हे काय तोच करू जाणे | III. स्वार्थी |
| ड. | जर त्याने मदत केली असती. तर माझे काम झाले असते. | IV. विदयर्थी |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | III | II | I | IV |
| (3) | III | I | IV | II |
| (4) | II | I | IV | III |

**22. पुढीलपैकी मिश्र वाक्य कोणते?**

(1) तितके आपल्या विचारांना महत्त्व आहे, तितकेच आपल्या भावनांनाही आहे.
(2) ती इतकी रडली की तिचे डोळे सुजले.
(3) मी काल जो मुलगा पाहिला तो हा.
(4) वरील सर्व वाक्ये

**23. वाक्यार्थाला बाध न आणता रचनेत केलेला बदल म्हणजे ......**

(1) वाक्यविन्यास (2) वाक्यपरिवर्तन
(3) अर्थपरिवर्तन (4) वाक्य संश्लेषण

**24. पुढीलपैकी कोणते वाक्य आज्ञार्थी नाही?**

(1) तुम्ही आज नाटकाला जाऊ नका
(2) सकाळी लवकर उठा
(3) तू अभ्यास करशील ना?
(4) तू आज अभ्यास पूर्ण कर

25. **पुढीलपैकी चुकीची वाक्ये सांगा :**

अ. शब्दांच्या आठ जाती आहेत.

ब. शब्दांची कार्ये आठ प्रकारची आहेत.

क. एकच शब्द निरनिराळ्या वाक्यात एकच कार्य करतो.

ड. जात बदलली तरी अर्थ बदलत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ व ब (2) ब व क

(3) अ व ड (4) क व ड

26. **'पांढरी टोपी घातलेला मुलगा खोड्या करतो' या वाक्यातील मूळ उद्देश ....... आहे.**

(1) पांढरी टोपी (2) टोपी घातलेला

(3) खोड्या करतो (4) मुलगा

27. **पुढील वाक्यातील क्रियापदांच्या प्रकारच्या जोड्या लावा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| अ. या औषधाने त्याला आराम पडावा | I. स्वार्थ क्रियापद |
| ब. बाबा, तुम्ही आम्हाला क्षमा करा | II. संकेतार्थ क्रियापद |
| क. तो अभ्यास करतो | III. आज्ञार्थ |
| ड. अभ्यास केला असता तर तो नापास झाला नसता. | IV. विध्यर्थ |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | III | IV | II | I |
| (4) | IV | III | I | II |

28. **'मुले वर्गाबाहेर मोठमोठ्याने गप्पा मारीत उभी होती' या वाक्यातील विधेयविस्तार .......**

(1) उभी होती

(2) गप्पा मारीत

(3) मुले

(4) वर्गाबाहेर मोठमोठ्याने गप्पा मारीत

29. **पुढील वाक्य प्रश्नार्थक बनवा.**
**फक्त भारतीय संघच अजिंक्य आहे.**

(1) भारतीय संघाला कोण हरवू शकेल का?

(2) भारतीय संघ नेहमीच अजिंक्य राहिल का?

(3) भारतीय संघाला हरवणे शक्य आहे का?

(4) भारतीय संघाशिवाय दुसरा कोणता संघ अजिंक्य आहे?

30. **'आमचा बंगला इमारतीआड झाकला गेला' या वाक्यातील 'इमारतीआड' हा शब्द ....... याचे काम करतो.**

(1) अर्थपूरक (2) आधारपूरक

(3) कर्मपूरक (4) विधिपूरक

31. **पुढील वाक्यांच्या जोड्या जुळवा :**

| | |
|---|---|
| अ. काय मजा आली सहलीत! | I. नकारार्थी |
| ब. शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काय केले नाही? | II. होकारार्थी |
| क. लोकांचे अज्ञान पाहून महात्म्याला दुःख होते. | III. उद्गारार्थी |
| ड. तुझे असे खराब अक्षर अगदी बघवत नाही. | IV. प्रश्नार्थक |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | III | IV | I | II |
| (2) | III | IV | II | I |
| (3) | III | I | II | IV |
| (4) | II | III | I | IV |

32. **'श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली.' या वाक्यातील प्रत्यक्ष कर्म ....... आहे.**

(1) गीता (2) अर्जुनाला

(3) श्रीकृष्णाने (4) विधान अकर्मक

33. **केवलवाक्यात एकच उद्देश्य असते व विधेयक एकच नसते.**

(1) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(2) पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर

(3) पूर्ण वाक्य बरोबर

(4) पूर्ण वाक्य चूक

34. **पुढीलपैकी ....... वाक्प्रचार नाही.**

(1) कान उघडणी करणे

(2) नाक मुरडणे

(3) डोक्यावर बसणे

(4) आसू ना मासू कुत्र्याची सासू

35. **पुढील कोणते वाक्य बरोबर आहे?**

अ. वाक्प्रचाराला तीन शब्दांची मर्यादा असते.

ब. वाक्प्रचार हा शब्दसमूह असतो.

क. वाक्प्रचार संपूर्ण वाक्य असते.

ड. वाक्प्रचार जसेच्या तसे वापरायचे असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) ब व ड बरोबर (3) सर्व पर्याय चूक

(2) अ व क बरोबर (4) सर्व पर्याय बरोबर

**36. स्वातीचे पती कारगिलच्या युद्धात मृत्यू पावले. या वाक्यातील अधोरेखित शब्दसमूहासाठी खालीलपैकी योग्य वाक्प्रचार ओळखा.**

(1) दिवे लावणे (2) मातीत मिसळणे
(3) कामी येणे (4) बारा वाजणे

**37. 'कांदा पडला पेवात पिसा हिंडे गावात' ही म्हण कोणत्या बोलीतली आहे?**

(1) वऱ्हाडी (2) मालवणी
(3) सातारी (4) हलबी

**38. खालील वाक्य पूर्ण करण्यासाठी**
**आपला संघ जिंकू शकणार नाही हे लक्षात आल्यावर संघ प्रमुख ..... खालीलपैकी योग्य वाक्प्रचाराची निवड करा.**

(1) डोळे उघडणे (2) गहिवरणे
(3) दातओठ खाणे (4) पथ्यावर पडणे

**39. खालील वाक्प्रचाराचा योग्य अर्थ निवडा.**
**जोडे फाटणे**

अ. नाहक ये-जा करणे
ब. खूप कष्ट करणे
क. बेजार होणे
ड. खेटे घालणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ व ब बरोबर (2) ब व क बरोबर
(3) अ व क बरोबर (4) अ व ड बरोबर

**40. प्रभाकरराव निवृत्त झाले की सीतारामने लगेच श्रीकांतशी संधान बांधले म्हणतात ना .......**

(1) जसे शिक्षण तसे लक्षण
(2) जात्याची बोळाऊ आणि येत्याची पाठराखी
(3) जुलमाचा रामराम
(4) जेथे भाव तेथे देव

**41. 'वारंवार वाईट घडत गेले तर दुःख सहन करण्याची सवय जडते' या अर्थाची म्हण सांगा.**

(1) दुभत्या गाईच्या लाथा गोड
(2) रोज मरे त्याला कोण रडे
(3) पुढच्यास ठेच मागचा शहाणा
(4) झाकली मूठ सव्वा लाखाची

**42. पुढील वाक्यपूर्ण करण्यासाठी योग्य म्हण निवडा :**
**अतुलला कितीतरी वेळा सांगितले की, कर्ज काढून कोणताही मोठेपणा करू नकोस ? तरी त्याने खाजगी सावकाराकडून वाढदिवसासाठी पुन्हा कर्ज काढले, म्हणतात ना**

(1) वेड पांघरुन पेडगावला जाणे
(2) वड्याचे तेल वांग्यावर
(3) पालथ्या घड्यावर पाणी
(4) चुलीतून निघून वैलात जाणे

**43. 'साधा पण गुणी मनुष्य' या अर्थाचा वाक्प्रचार सांगा :**

अ. जमदग्नि ब. भागूबाई
क. झाकले माणिक ड. उंटावरचा शहाणा

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ व ब बरोबर (2) ब बरोबर
(3) क बरोबर (4) ड बरोबर

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 44 ते 48 प्रश्नांची उत्तरे द्या :**

लोकप्रियतेची आणखी काही लक्षणे शोधावी लागतात. विशिष्ट सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीमध्ये समूहाची काही स्वप्ने अपुरी राहिलेली असतात. समूहमनाला काही सल असतात. काही गोष्टी घडाव्यात असे वाटत असतानाही घडलेल्या नसतात. विपरीत वास्तवामध्ये या गोष्टी घडण्याला वाव नसतो. अशा परिस्थितीत वास्तवापासून दूर असलेल्या स्वप्नभूमीमध्ये काही मानबिंदूंची निर्मिती समूहाकडून केली जाते. या मानबिंदूंना स्पर्श करणारे लेखन प्रचंड लोकप्रिय ठरण्याची शक्यता असते. केवळ रंजन करणाऱ्या लेखनासारखे ते पारदर्शकपणे उथळही वाटत नाही. अशा लेखनाला विशिष्ट सामाजिक, सांस्कृतिक अवस्थेत प्रतिष्ठाही मिळण्याची शक्यता असते. ना. सी. फडके, शिवाजी सावंत, विश्वास पाटील यांच्या लेखनाचा या दृष्टिकोणातून विचार करता येतो.

समाजात कधी कधी जोरकस संप्रदाय निर्माण होतात. असे संप्रदाय निर्माण होण्यामागे अर्थातच समाजाने घेतलेले विशिष्ट वळण असते. इतिहासाच्या विशिष्ट अवस्थेत असे संप्रदाय निर्माण होणे अपरिहार्य असते. असे संप्रदाय निर्माण झाले की त्यांचा दृष्टिकोण मांडणाऱ्या साहित्यकृती लोकप्रिय होऊ लागतात. आपल्या संप्रदायाच्या दृष्टिकोणातून निर्माण झालेले लेखन विशिष्ट काळापुरते मर्यादित आहे हे न ओळखता त्याचे महत्त्व चिरकाल टिकणारे आहे असे दाखविले जाणारे पुरावे शोधून काढले जातात. अशा कादंबऱ्या लोकप्रियही होतात आणि प्रतिष्ठितही होतात. लोकप्रियता आणि प्रतिष्ठा या दोन गोष्टी अशाप्रकारे एकमेकांपासून फार दूर नसतात. त्यांच्यात देणेघेणे असण्याची शक्यता असते.

तथाकथित प्रतिष्ठित किंवा अभिजात म्हणून गणल्या जाणाऱ्या साहित्यकृतींच्या मागे व्यापक स्वरूपाचे सांस्कृतिक राजकारणही असते. समाजाच्या अभिरुचीवर विशिष्ट वर्गाचे दडपण असू शकते. या वर्गाला महत्त्वाचे वाटणारे निकष ते सार्वकालिक आहेत, अशा पद्धतीने मांडले जातात. विशिष्ट काळात समाजावर ज्या वर्गाच्या जाणिवेचा प्रभाव असतो, तीच जाणीव महत्त्वाची, मूलभूत आणि प्रतिष्ठित ठरत असते. त्यातूनच समीक्षकप्रिय, अभिजात, श्रेष्ठ साहित्यकृतींचा जन्म होत असतो, असे अनेकांचे म्हणणे असते. थोडक्यात अभिजातता, श्रेष्ठता ही कालसापेक्ष मूल्ये असतात, असे या दृष्टिकोणातून म्हणता येईल. नव्या सामाजिक संरचना अस्तित्वात

the UNIQUE academy

येऊ लागल्या की नवे सूर घुमू लागतात. नवे निकष निर्माण होतात. नव्याने तथाकथित अभिजात साहित्यकृतींचा जन्म होऊ लागतो. हे फार ताणू नये हे योग्य असले तरी याही दृष्टिकोणात तथ्य आहे, असे म्हणावे लागते.

असे सतत घडत असते. पाच-पन्नास वर्षांचा कालखंड घेतला की या प्रक्रियेच्या खाणाखुणा आपल्या साहित्यसंस्कृतीमध्येही जाणवतात, हे आपल्या लक्षात येईल. यामधून फक्त एक गोष्ट शिल्लक राहते. भौतिक यश आणि प्रतिष्ठा यांचे नाते कुठल्याही कालखंडात जमले आहे, असे दिसत नाही. सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रामध्ये अपयशाला मोठे मूल्य असते. प्रचंड लोकप्रिय ठरणाऱ्या व लेखकाला भरपूर मानधन मिळवून देणाऱ्या साहित्यकृतींपेक्षा वाचकप्रिय न ठरणाऱ्या, वाचायला अवघड असणाऱ्या, वाचकाची परीक्षा पाहणाऱ्या साहित्यकृती नेहमीच 'अभिजात' व 'प्रतिष्ठित' ठरताना दिसतात.

**44. साहित्याच्या लोकप्रियतेची लक्षणे कोणती आहेत?**

(1) समूहाच्या मानबिंदूंना त्यात स्पर्श केलेला असतो.
(2) संप्रदायाची निर्मिती आणि व्यापक सांस्कृतिक राजकारण त्यामागे असते.
(3) विशिष्ट वर्गाच्या जाणिवेचा प्रभाव साहित्यावर असतो.
(4) वरील सर्व पर्याय बरोबर आहेत.

**45. कोणत्या साहित्यकृती अभिजात ठरतात?**

(1) समूहमनाची अपुरी स्वप्ने त्यात पूर्ण झाली आहेत.
(2) समाजात संप्रदाय निर्माण होऊन त्यातून आलेले साहित्य
(3) विशिष्ट वर्गाची जाणीव प्रतिष्ठित ठरुन त्यातून निर्माण झालेली साहित्यकृती.
(4) वरीलपैकी एकही पर्याय बरोबर नाही

**46. संबंधित उताऱ्यात पुढील मध्यवर्ती कल्पना आहे.**

(1) साहित्याची चिकित्सा करणे.
(2) सांप्रदायिक साहित्याचा मागोवा घेणे.
(3) साहित्यामागील सांस्कृतिक राजकारण स्पष्ट करणे.
(4) लोकप्रिय साहित्याची चिकित्सा करणे.

**47. या उताऱ्याचे सार असे काढता येते की,**

(1) भौतिक यश आणि प्रतिष्ठा यांचे नाते जमत नाही.
(2) सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रात अपयशाला मूल्य असते.
(3) समूहाच्या मानबिंदूंना लोकप्रिय साहित्यात स्पर्श केलेला असतो.
(4) लोकप्रिय साहित्यापेक्षा अभिजात साहित्य काही काळानंतर प्रतिष्ठित ठरते.

**48. या उताऱ्यासाठी योग्य शीर्षक**

(1) श्रेष्ठ साहित्य
(2) सांप्रदायिक साहित्य
(3) लोकप्रिय साहित्य आणि अभिजात साहित्य
(4) साहित्याची लोकप्रियता

**49. खालील शब्दाचा शब्द समूह सांगा :**
**'आधी जन्मलेला'**

अ. प्रथमेशक ब. अनुज
क. अग्रज ड. वडिलधारा

**पर्यायी उत्तरे :**

(1) क बरोबर (3) क व ब बरोबर
(2) क व ड बरोबर (4) ड बरोबर

**50. पुढीलपैकी ....... हा शब्द शब्दसाधित गटातील आहे.**

(1) वेडा (2) चालू
(3) वाढपी (4) नाचरा

**51. खालीलपैकी कोणता शब्द जोडशब्द नाही?**

अ. हवापाणी ब. बारीकसारीक
क. शेतीभाती ड. ठाकठीक

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त ब बरोबर (2) फक्त अ बरोबर
(3) फक्त ड बरोबर (4) फक्त क बरोबर

**52. 'माजी' या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्दाचा उपयोग ....... या वाक्यात केला आहे.**

अ. अजि म्या ब्रह्म पाहिले.
ब. विद्यमान परिस्थितीत मला हेच योग्य वाटते.
क. पुरोगामी महाराष्ट्रात हे असे घडू शकते.
ड. प्रतिगामी विचाराच्या व्यक्तींनी याला कडाडून विरोध केला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) पुरोगामी महाराष्ट्रात हे असे घडू शकते.
(2) अजि म्या ब्रह्म पाहिले.
(3) विद्यमान परिस्थितीत मला हेच योग्य वाटते.
(4) सर्व पर्याय चुकीचे.

**53. खालील शब्दांचा प्रकार कोणता?**
**लगबग, गडबड, पडझड, लटपट**

अ. जोडशब्द ब. अभ्यस्त शब्द
क. सामासिक शब्द ड. समूहदर्शक शब्द

**पर्यायी उत्तरे :**

(1) ब पर्याय बरोबर
(3) क पर्याय बरोबर
(2) क व ब पर्याय चूक
(4) अ व ब पर्याय चूक

**54. ....... हा शब्द उपसर्गसाधित आहे.**

(1) आडनाव (2) मोकळीक
(3) धिटाई (4) हाताळ

55. **मराठी शब्दाच्या शेवटी येणारा इ–कार किंवा उ–कार दीर्घ लिहावा :**
अ. या वाक्याचा पूर्वार्ध बरोबर आहे.
ब. या वाक्याचा पूर्वार्ध चूक आहे.
क. हे वाक्य पूर्ण बरोबर आहे.
ड. हे वाक्य पूर्ण चूक आहे.
**पर्यायी उत्तरे :**
(1) अ व ब बरोबर
(2) क बरोबर
(3) ड बरोबर
(4) सर्व पर्याय चूक आहेत

56. **....... हा शब्द तत्सम नाही.**
(1) पूजा (2) गीता
(3) लीला (4) मेहनत

57. **'मला जरा झोपू दे. आज रविवार आहे,' यात कोणता व्यंगार्थ नाही?**
अ. मला जागरण झाले आहे.
ब. आज ऑफिसला सुट्टी आहे.
क. आज उठण्याची घाई नाही.
ड. रविवारचे झोपायचेच असते.
**पर्यायी उत्तरे :**
(1) अचूक (2) ब बरोबर
(3) अ व ड बरोबर (4) ब व क बरोबर

58. **पुढीलपैकी देशी नसलेला शब्द आहे.**
(1) ताई (2) बाजरी
(3) गुडघा (4) झोप

59. **'गाई' पाण्यावर काय म्हणूनी आल्या?**
**का ग गंगायमुनाही या मिळाल्या?**
**या काव्याची कोणती शब्दशक्ती आहे?**
(1) अभिधा (2) लक्षणा
(3) व्यंजना (4) लक्षार्थ

60. **....... हा सामासिक शब्द आहे.**
(1) समीकरण (2) धर्मशाळा
(3) रसातळ (4) क्षेत्रफळ

61. **Give one word for the following phrase :**
**Living for years and years**
(1) Perennial (2) Permanent
(3) Annual (4) Continuous

62. **Match the following:**

| | I | | II |
|---|---|---|---|
| a. | Philanthropist | I. | person who does not believe in God |
| b. | Atheist | II. | One who believes in fate |
| c. | Pessimist | III. | A lover of mankind |
| d. | Fatalist | IV. | A person who looks at the dark side of things |

**Answer options :**

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | II | IV | I | III |
| (2) | III | I | II | IV |
| (3) | III | I | IV | II |
| (4) | IV | II | III | I |

63. **Choose the suitable meaning of the underlined word from the alternatives given.**
**The poem is written in a very <u>lucid</u> style.**
(1) intricate (2) noble
(3) elaborate (4) clear

64. **I have <u>given up</u> driving since I got involved in that accident.**
**The underlined phrase in the sentence above means**
a. stopped b. discontinued
c. abandoned d. sacrificed
**Answer options :**
(1) d only (2) a only
(3) b only (4) All of these

65. **Choose one word which can be substituted for the given words.**
**"A man of odd habits"**
(1) Eccentric (2) Introvert
(3) Cynical (4) Moody

66. **The adjective form of the noun 'Picture' is formed by the suffix**
(1) - ous (2) - ial
(3) - esque (4) - ish

67. **Choose the correct simple sentence converted for the following:**
**"A man who is dead tells no tales."**
(1) A man that is dead tell no tales.
(2) A tale could not be told by a dead man.
(3) A dead man tells no tales.
(4) A man doesn't tell dead tales.

68. **You must <u>take heart</u> and face life boldly. Identify the correct meaning of the underlined phrase in the given context.**
(1) feel excessively
(2) take advantage
(3) feel bold
(4) work hard

**69. Choose the correct word to fill in the blank in the following sentence :**
**Baptisms, Weddings and Funerals are examples of .......**

(1) Rights (2) Rites
(3) Writes (4) None of these

**70. The underlined clause in the following sentence is a/an**
**"<u>Who stole the teaspoon</u> is a mystery."**

(1) Adverb clause (2) Noun clause
(3) Adjective clause (4) Relative clause

**71. Who looks after the visitors?**
**The sentence above changes correctly into passive voice as**

(1) How are the visitors looked after?
(2) Whom are the visitors looked after?
(3) By whom are the visitors looked after?
(4) By whom the visitors is looked after?

**72. We have funds <u>which would be enough for the work</u>.**
**The underlined clause is a/an**

(1) Noun clause
(2) Adjective clause
(3) Adverb clause
(4) No clause, it's a phrase

**73. Identify the sentences written in correct passive voice.**

a. Let that book be brought.
b. You are requested to do me a help.
c. I hope my friends to assist me.
d. Let me be told that the office must be left.

**Answer options :**

(1) a and b only (2) a and c only
(3) band d only (4) a, b and d only

**74. Though he abused me, ....... I will follow him.**
**Which one of the following correctly fills in the blank in the sentence above?**

(1) but (2) still
(3) yet (4) and

**75. It matters little whether we win or lose.**
**The sentence above correctly changes into an interrogative sentence as**

(1) Does it matter little whether we win or lose?
(2) Doesn't it matter whether we win or lose?
(3) What does it matter whether we win or lose?
(4) Does we win or lose matter?

**76. Some grains are at least as nutritious as rice.**
**Select the correct comparative degree of the above sentence.**

a. Rice is not more nutritious than some other grains are.
b. Some grains are not less nutritious than rice.
c. Rice is least nutritious than many other grains.

**Answer options :**

(1) a only (2) b only
(3) c only (4) a and b only

**77. Nobody is free from sin.**
**The sentence above correctly changes into interrogative form as**

(1) Is there anybody free from sin?
(2) Is there nobody free from sin?
(3) Who is not free from sin?
(4) Who is free from sin?

**78. said, "Let me prove my statement."**
**Select the correct indirect narration of the sentence.**

a. I told to prove my statement.
b. I proposed that I should prove my statement.
c. I suggested to prove my statement.

**Answer options :**

(1) a only
(2) b only
(3) c only
(4) All of the above

**79. He and his five brothers love ....... very much.**
**Which one of the following pronouns correctly fills in the blank in the sentence above?**

(1) each other (2) themselves
(3) one another (4) one other

**80.** (1) The gold is a precious metal.
(2) The gold is the precious metal.
(3) Gold is a precious metal.
(4) Gold is precious metal.

**Which of the above is a correct sentence?**

**81. Shall I buy a scooter ?**
**The modal in the sentence above has been used to express**

(1) Promise (2) Suggestion
(3) Seeking permission (4) Giving advice

**82. a. The girls have got a unique opportunity.**
**b. He studies in the university.**
**c. The father has gone to the office.**
**Identify the correct sentence.**

(1) a only (2) b only
(3) c only (4) All of the above

the Unique academy

**83. Identify the correct sentence.**
(1) This premise looks too big.
(2) These premises look too big.
(3) This premises looks too big.
(4) These premise look too big.

**84. The ship was wrecked and every man, woman and child ....... drowned.**
**The verb that agrees correctly with the subject in the sentence above is**
(1) was (2) were
(3) had (4) had been

**85. Identify the correct sentence/s.**
a. I am not understanding this letter.
b. She arrived at the theatre at 6 pm but the film had already started.
c. If I get any news, I'll tell you.
**Answer options :**
(1) a and c only (2) b and c only
(3) a only (4) All of the above

**86. The most famous English poets are Shakespeare, Milton, Wordsworth, Shelley, Byron and Keats. The punctuation mark that should follow the verb 'are' in the sentence above is**
(1) Semicolon (2) Colon
(3) Comma (4) Hyphen

**87. Keep to the left.**
**The imperative structure above expresses**
(1) a command (2) a solemn advice
(3) a prayer (4) a petition

**88. Identify the sentence/s that express/es subjunctive mood.**
a. Behold, the dreamer comes.
b. Murder, though it have no tongue, will speak.
c. Long live the king.
**Answer options :**
(1) a and c only (2) b and c only
(3) c only (4) All of the above

**89. Identify the correct sentence/s.**
a. I could read that book in two hours yesterday.
b. I was able to read that book in two hours yesterday.
**Answer options :**
(1) a only (2) b only
(3) Both a and b (4) Neither a nor b

**90. I am / here / since / 1951.**
**1 2 3 4**
**The error occurs in part ..... of the sentence above.**
(1) 4 only (2) 2 only
(3) 1 only (4) 3 only

**Read the following passage carefully and answer the questions from 91 to 95 :**

Nobody knows how speech was born, although many interesting theories have been put forward. There are some who believe that man first made vocal sounds as an accompaniment to physical efforts and that more complicated forms of speech grew out of the range of grunts and interjections produced by bodily activity. There are others who believe that movements of the organs of speech grew out of an attempt to imitate gestures made by the hand. Still others believe that speech was an attempt to imitate directly the action or the object or the emotion being described.

Whatever the origin of speech, we can be certain that man did not begin to feel the need to speak until he began to live in communities, for speech is essentially social in character. It is, however, as difficult to explain the origins of speech as it is to explain why certain combinations of sounds came to be associated with certain objects. Many primitive peoples believed and some still believe, in the magical power of names. They believed, for example, that God's name was a part of him and therefore possessed some of the divine powers of God himself. A reflection of the same attitude may be seen in a child's unwillingness to tell a stranger his name, since he feels that with his name he is giving a part of himself. Similarly, parents give their children the names of gods or saints of famous men in the hope that the name will carry with it some of the great qualities of its original possessor. Most of us, too, feel annoyed or hurt if somebody mispronounces our name or calls us by the wrong name.

Man first discovered that everything could be given a name and later found out that because words are really only symbols, the same object may be given several different names; to put it simply, that a cat may be called "a cat', 'an animal', 'a mammal' or 'a feline'. Class words like 'anima, 'fruit, "vegetable' must have appeared at a much later stage than words like "lion', 'orange' or 'cabbage'. Names for abstract qualities such as 'patience and 'courage' must have come much later,

**91. A child hesitates to tell a stranger his name because**
(1) he does not want to hurt God.
(2) he does not like to disclose his identity.
(3) he thinks that telling his name is giving a part of himself.
(4) his parents prohibit him from doing so.

**92. According to the third theory of Origin of Speech**
(1) speech was an attempt to imitate directly the action or the object.

the UNIQUE academy

(2) speech originated out of man's need to live in communities.
(3) speech originated as an attempt to imitate gestures made by the hand.
(4) man needs to produce vocal sounds to accompany his physical efforts.

**93. Primitive people named themes elves after God's names because**
(1) they believed firmly in godly qualities.
(2) they believed that god was their original possessor.
(3) they believed that god's name was a part of themselves.
(4) they believed that god's name was sacred.

**94. Man discovered later that**
(1) use of speech is essential for existence.
(2) only abstract qualities like 'patience' and 'courage' can be named.
(3) the same object needs different names.
(4) the same object may be given different names.

**95. The title that suits best to this passage is**
(1) Man and Speech
(2) Man, Society and Speech
(3) The Origin of Speech
(4) Speech and the Surrounding World

**96. The term 'Vertical' is synonymous with**
(1) Straight (2) Perpendicular
(3) Oblique (4) Diagonal

**97. Choose the best synonym for the following word :**
**'Mention'**
(1) Create (2) Refer to
(3) Oppose (4) Lead to

**98. Which one of the following phrases expresses the correct meaning of the word 'Neologism'?**
(1) A new generation that has emerged lately
(2) A new logic that derives conclusion
(3) A new language that only the younger generation knows
(4) A new word coined by an author

**99. Spot the error type in the following sentence :**
**"The park was serine at twilight."**
(1) Capitalization (2) Punctuation
(3) Spelling (4) Grammar

**100. Match the synonyms :**

| | I | | II |
|---|---|---|---|
| a. | Liberal | I. | Sharp |
| b. | Keen | II. | Generous |
| c. | Melodious | III. | Crowd |
| d. | Multitude | IV. | Musical |

**Answer options :**

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | II | I | IV | III |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | II | IV | I | III |
| (4) | II | I | III | IV |

# STI - मुख्य परीक्षा 2017 उत्तरे
# मराठी व इंग्रजी

| Ans | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 4 | 4 | 3 | 1 | 3 | 3 | 2 | 2 | 2 |
| 11 | 4 | 1 | 2 | # | 4 | 2 | 4 | 1 | 1 | 4 |
| 21 | 3 | 4 | 2 | 3 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 2 |
| 31 | 2 | 1 | 1 | 4 | 1 | 3 | 1 | 3 | 4 | 2 |
| 41 | 2 | 3 | 3 | 4 | 4 | 4 | 4 | 3 | 1 | 1 |
| 51 | 1 | 3 | 1 | 1 | 2 | 4 | 3 | 1 | 2 | 1 |
| 61 | 1 | 3 | 4 | 4 | 1 | 3 | 3 | 3 | 2 | 2 |
| 71 | 3 | 2 | 4 | 3 | 3 | 4 | 4 | 2 | 3 | 3 |
| 81 | 3 | 1 | 2 | 1 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 3 |
| 91 | 3 | 1 | 3 | 4 | 3 | 2 | 2 | 4 | 3 | 1 |

# या चिन्हाने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत.